# महाराष्ट्र विधानपरिषद
## दिवसाच्या कामकाजाचा क्रम
## बुधवार, दिनांक ३ एप्रिल, २०१३.
## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजेपर्यंत)

**शासकीय विधेयक -**

**विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३.

**(क) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्रीमती शोभाताई फडणवीस, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४७ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ख) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत डॉ.नीलम गोऱ्हे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

**(ग) विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत श्री.रामदास कदम, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

" सन २०१३ चे वि.प.वि. क्रमांक २ - महाराष्ट्र सहकारी संस्था (सुधारणा) विधेयक, २०१३ विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ४० सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सद्य अधिवेशनाच्या अखेरपर्यंत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे.**

**दोन : कागदपत्रे सभागृहासमोर ठेवणे -**

**मुख्यमंत्री** : "श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), अधिनियम, २००४ च्या कलम २५ च्या पोट-कलम (४) अन्वये श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी), (व्यवस्थापन समितीच्या सदस्यांची नियुक्ती आणि प्रतिज्ञापत्राचे नमुने) नियम, २०१३ प्रसिध्द करणारी अधिसूचना क्रमांक एसएसव्ही-२०१२/प्र.क्र.३३/का सोळा, दिनांकित २४ जानेवारी, २०१३" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन : म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना -(असल्यास).**

**चार : म.वि.प. नियम ९३ अन्वये निवेदन - (असल्यास).**

**पाच : लक्षवेधी सूचना - (म.वि.प.नियम १०१ अन्वये) -**

(१) **श्रीमती शोभाताई फडणवीस वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वने मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

" गडचिरोली जिल्ह्यातील सुमारे ७०० गावांनी वन हक्क कायद्यांचा वापर करुन ४ लाख हेक्टर जंगलावर सामूहिक मालकी मिळविणे, या जंगलातील बांबू विक्रीतून कोट्यावधीचे उत्पन्न या गावाला मिळत असणे, कायद्यानुसार बांबू विक्रीचा हक्क ग्रामसभांना असला तरी हे काम वन खात्याच्या मार्गदर्शनाखाली केले जाण्याचे असलेले बंधन, त्यानुसार गडचिरोली वन विभागातील पोटेगांव क्षेत्रातील मारदा, जमगाव व लगतच्या एकूण सहा गावांनी यावर्षी बांबू विक्रीचा निर्णय वन खात्याला कळविणे, पाहणीनंतर सदरचा बांबू तोडण्यायोग्य नसल्याने वन विभागाने बांबू तोडण्यास नकार देणे, असे असूनही त्यांनी नक्षलवाद्यांची धमकी देत बांबू तोडण्यात येणार असल्याचे या गावकऱ्यांना सांगण्यात येणे, सदरची तक्रार कर्मचाऱ्यांनी वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे केल्यावरही याबाबत कोणतीच कारवाई न होणे, याबाबत शासनाने तातडीने योग्य ती कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

(२) **श्री. विनायक राऊत,** डॉ.सुधीर तांबे **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्यातील १६ आयुर्वेद व ३ युनानी महाविद्यालये १०० टक्के शासन अनुदानीत असतांनाही दोन्ही महाविद्यालयातील ४०० अध्यापकांना डिसेंबर, २०१२ पासून पगार न मिळणे, त्याचबरोबर अध्यापक व महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांना राज्य सरकारी कर्मचाऱ्यांप्रमाणे पाचवा

व सहावा वेतन आयोग लागू केल्यानंतर त्याचे लाभ सहा वर्षे उशिराने मिळणे, अध्यापकांच्या संघटनेने आयुर्वेद संचालनालयाकडे याबाबत विचारणा केली असता वैद्यकीय शिक्षण विभागावर जबाबदारी टाकून टोलवाटोलवीची मिळणारी उत्तरे, परिणामी त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष व असुरक्षिततेची भावना, शासनाने याबाबत तातडीने केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(३) **सर्वश्री माणिकराव ठाकरे,** संजय दत्त **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **वैद्यकीय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये मुंबईच्या जे.जे. हॉस्पिटलच्या दर्जाचे स्वतंत्र कर्करोग रुग्णालय (कॅन्सर हॉस्पिटल) होणार असल्याचे शासनाने सन २०१० साली घोषित करुनही अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही करण्यात आली नसणे, कर्करोग्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत असून या मेडिकल कॉलेजमध्ये सध्या असलेल्या रेडीएशन यंत्राची क्षमता दिवसाला जेमतेम ४० रुग्णांना सेवा देण्याची असताना या यंत्राचा वापर दिवसाला १०० रुग्णांना उपचार देण्यासाठी करण्यात येणे, वाजवी पेक्षा जास्त वापर करण्यात येत असल्याने हे यंत्र हाताळणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असणे, कॅन्सरग्रस्त रुग्णांना कॅन्सरच्या पूर्ण उपचारासाठी आवश्यक सर्व यंत्रसामुग्री व कर्मचारी वर्गासह नागपूर मेडिकल कॉलेजमध्ये स्वतंत्र कॅन्सर हॉस्पिटल सुरू करण्याबाबतची स्थानिकांतून होत असलेली मागणी, याकडे शासन करीत असलेले दुर्लक्ष, यामुळे त्यांनी धरणे आंदोलन करणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रिया."

(४) **सर्वश्री. विक्रम काळे,** सतीश चव्हाण, जयवंतराव जाधव **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबींकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील **:-**

"राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना शासन निर्णय क्रमांक वेतन ११०९/प्र.क्र.४४/सेवा-३, मंत्रालय, मुंबई -३२, दिनांक १ एप्रिल, २०१० नुसार लागू करण्यात आलेली असणे, त्यामधील मुद्दा क्र.५ मध्ये हे आदेश केवळ राज्य शासकीय व जिल्हा परिषद कर्मचाऱ्यांना लागु राहतील असे नमुद केलेले असणे, सदर सुधारित सेवातंर्गत आश्वासित प्रगती योजने पासून मान्यता प्राप्त अनुदानित प्राथमिक शाळेतील शिक्षकेत्तर कर्मचारी वंचीत राहिलेले असणे, यामुळे त्यांच्यात पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने केलेली व करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**सहा : म.वि.प. नियम १०१-अ अन्वये विशेष उल्लेख - (असल्यास).**

## - मध्यंतर -

सात : **(मंगळवार, दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला प्रस्ताव) -**

**सर्वश्री. हेमंत टकले,** सुभाष चव्हाण, अमरसिंह पंडित, सतीश चव्हाण, प्रा.सुरेश नवले, सर्वश्री. एम.एम.शेख, अब्दुल्ला खान दुर्राणी, विक्रम काळे, कपिल पाटील, विनायकराव मेटे, राणा जगजितसिंह पाटील **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव - (मंत्र्यांचे उत्तर) -**

"सन १९७६ मध्ये पूर्ण झालेल्या औरंगाबाद जायकवाडी धरणाची क्षमता १०२ टीएमसी असणे, परंतु धरणाच्या वरील बाजूस ११५ टीएमसी पाणी अडविण्याची परवानगी आयोगाने दिलेली असतांनाही जागोजागी बंधारे व धरणे बांधून नियमबाह्य पध्दतीने १८५ टीएमसी पाणी अडविल्याने जायकवाडी संकल्पीत साठ्याच्या केवळ २ टक्के पाणी आले असणे, औरंगाबाद, बीड, जालना, परभणी या जिल्ह्यातील पेयजल सिंचन व उद्योग धंदे, शिवाय परळी औष्णिक विद्युत निर्मिती केंद्र जायकवाडीच्या पाण्यावरच अवलंबून असून मराठवाड्यातील जनता पाण्यासाठी हवालदिल झालेली असणे, जायकवाडी प्रकल्प धरण या खोऱ्यातील पाणी साठ्याची टक्केवारी ३५ टक्के असून संबंधित कायद्यातील तरतूदीनुसार जायकवाडीच्या वरील भागातील धरणांतून २७ अब्ज घनफूट पाणी सोडणे बंधनकारक असणे, कृष्णेचे २१ टीएमसी हक्काचे पाणी देण्यातही मराठवाड्यावर अन्याय झालेला असणे, तसेच मराठवाड्याच्या वाट्याला आलेल्या २५ टीएमसी पाण्यासाठी रु.४,८४५ कोटींची प्रशासकीय मान्यता दिलेली असून मागील ५ वर्षात यापैकी रु.५३५ कोटींची तरतूद झालेली असणे, उर्वरित कामासाठी निधीची तरतूद त्वरीत करणे आवश्यक असणे, प्रत्यक्षात ७ टीएमसीचीच कामे सूरु असून, त्यात कृष्णा मराठवाडा सिंचन प्रकल्पाचा टप्पा नं.१ व कृष्णा भीमा स्थिरीकरण प्रकल्पाचा काही भाग असणे, हा प्रकल्प पूर्ण करणेसाठी ३३०० कोटी रुपयाची आवश्यकता असणे, गोदावरी खोऱ्यात नविन १८ टीएमसी पाणी साठवण्यास परवानगी असणे, परंतु नवीन लघू प्रकल्पाला मान्यता मिळत नसल्याने अडचणी येत असणे, याबाबतीत शासनाने त्वरीत निर्णय घेणे आवश्यक असणे, याकरीता शासनाने त्वरीत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया विचारात घेण्यात यावी."

आठ : **शासकीय विधेयक :-**

**विधानसभेने संमत केल्याप्रमाणे - विचार, खंडशः विचार व संमत करणे -**

सन २०१३ चे वि.स.वि. क्रमांक १ - महाराष्ट्र मूल्यवर्धित कर (सुधारणा) विधेयक, २०१३.

**नऊ : (मंगळवार, दिनांक २ एप्रिल, २०१३ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेला परंतु पुढे ढकलण्यात आलेला म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव) -**

**डॉ.सुधीर तांबे,** सर्वश्री प्रकाश बिनसाळे, सुभाष चव्हाण, श्रीमती दिप्ती चवधरी, सर्वश्री मोहन जोशी, चरणसिंग सप्रा, हेमंत टकले, रमेश शेंडगे, श्रीमती विद्या चव्हाण, श्रीमती अलका देसाई **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव -**

राज्यात अपंग व्यक्तींची संख्या एकूण लोकसंख्येच्या ३ टक्के म्हणजेच सुमारे ४० लक्ष असून अपंगांच्या विविध समस्या वर्षानुवर्षे प्रलंबित असणे, अपंग व्यक्तींसाठी महानगर व नगरपालिका क्षेत्रात स्टॉल, गाळे राखून ठेवावेत असा नियम असताना ही त्याची अंमलबजावणी न होणे, अपंग विकास वित्तीय महामंडळासाठी भरीव आर्थिक तरतूद नसणे, त्यामुळे अनेक योजना केवळ कागदावर रहाणे, अपंगांना विशेष अधिकार देणाऱ्या कायद्यामध्ये सुधारणा होणे आवश्यक असणे, अपंगत्व येऊ नये यासाठी प्रतिबंधात्मक उपचाराविषयी जनसामान्यांमध्ये विशेष जाणिव नसणे, जन्मतःच असलेल्या श्रवण दोषांमुळे बधीरत्व निर्माण होत असणे, कॉक्लिअर इंम्प्लांट (cochlear implant) या शस्त्रक्रियेमुळे हा दोष दूर होऊन त्या असंचय बालकांचे कर्णबधीरत्व दूर होऊ शकते, यासाठी शासनाने या शस्त्रक्रियेचा संपूर्णपणे भार उचलण्याची आवश्यकता, अपंगांसाठी असलेल्या शाळांमधील शिक्षकांच्या, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या अनेक समस्या, कंत्राटी पध्दतीने नेमणुका, विनाअनुदानीत शाळांचे प्रश्न, कार्यशाळेच्या कर्मचाऱ्यांचे निवृत्ती वेतन देणे, यासारखे अनेक प्रश्न प्रलंबित रहाणे व अपंग विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या सुविधा संख्यात्मक जरी पुरेशा वाटत असल्या तरी जगाच्या तुलनेत त्या परिपूर्ण नसणे, शैक्षणिक दर्जा विषयी दुर्लक्ष असणे, त्यात अधिक संशोधन व स्वंतत्र व्यवस्था निर्माण करण्याची गरज असणे, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व प्रोत्साहनात्मक योजनांचा अभाव असणे, याविषयी करावयाची उपाययोजना विचारात घेण्यात यावी.

**दहा : अर्धा-तास चर्चा - म.वि.प.नियम ९२ अन्वये - (बैठकीच्या शेवटी) -**

**(१) श्रीमती शोभाताई फडणवीस व इतर वि.प.स.पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"राज्यात शासनामार्फत राजीव गांधी विद्युतीकरण योजना राबविली जाणे, बी.पी.एल. धारकांना सदर योजनेचा फायदा मिळणे, राज्यात १३ लाख घरकुलधाराकांना त्याचा फायदा

मिळण्यासाठी ८०४ कोटी रूपये दिले जाणे, परंतु महावितरणाने सदर कंत्राट खाजगी कंत्राटदाराला देणे, त्यात लाभधारकांना विजेची तार, अर्थींग, वीजमीटर, मेनस्वीच, एक बल्ब इत्यादी पूर्ण साहित्य देण्याचे ठरणे, परंतू सदर कंत्राटदार निकृष्ट साहित्य वापरतात, लोखंडी मेनस्वीच ऐवजी फायबर मेनस्वीच बसविणे, त्यामुळे लवकरच सदर विद्युत साहित्य खराब होत असल्याच्या तक्रारी महावितरणाकडे लाभधारकांनी करणे, कंत्राटदाराचे अधिकाऱ्यासोबत असलेले लागेबांधे, त्यात होत असलेला गैरव्यवहार, शासनाने यावर त्वरीत कारवाई करण्याची आवश्यकता."

(२) **श्री.जयंत पाटील व इतर वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पनवेल तालुक्यातील (जि.रायगड) तळोजा एम.आय.डी.सी.मधील दिपक फर्टीलायझर्स कंपनीच्या व्यवस्थापनाच्या आडमुठ्या धोरणामुळे कामगार दिनांक ३ जानेवारी, २०१३ रोजीपासून संपावर असणे, कामगारांच्या वेतनवाढीचा प्रस्ताव १५ महिन्यापासून प्रलंबित असून दिनांक २५ ऑगस्ट २०११ रोजी मनुष्यबळ वाढीचा करार करण्यात आला असून त्यानुसार ७५४ मनुष्यबळ मान्य करण्यात येणे, सध्या ६५४ कायम कामगार असून त्यामध्ये कमी असणारे ९७ मनुष्यबळ देण्याचे सोडून पुढील चार वर्षात निवृत्त होणारे मनुष्यबळ धरुन एकूण १५३ कामगारांना कमी केल्याशिवाय वेतनवाढीबाबत विचार केला जाणार नाही, असा पवित्रा कंपनीने घेतलेला असणे, संपावर जाण्यापूर्वी दिनांक २० डिसेंबर, २०१२ रोजी बेमुदत संपाची कायदेशीर नोटीस देण्यात येणे, दिनांक २६ डिसेंबर, २०१२ रोजी मा.सहाय्यक कामगार आयुक्त, पनवेल दिनांक ३१ डिसेंबर, २०१२ रोजी अतिरिक्त कामगार आयुक्त, बांद्रा व दिनांक १ जानेवारी, २०१३ रोजी मा.कामगार मंत्री श्री.हसन मुश्रीफ यांनी संप होवू नये म्हणून संघटना प्रतिनिधी व व्यवस्थापन यांच्या बैठका घडवून आणणे, कामगार मंत्र्याकडील बैठकीमध्ये व्यवस्थापनाचे निर्णयक्षम अधिकारी नसल्यामुळे कामगार मंत्र्यांनी कोकणभवन येथील जॉईंट डायरेक्टर श्री.कारंडे यांना आदेश देणे. दिपक फर्टीलायझर्सच्या सर्व प्लॅन्टची तपासणी करुन अहवाल द्यावा, परंतू जॉईंट डायरेक्टर कारंडे व त्यांचे सहाय्यक डेप्युटी डायरेक्टर सेफ्टी श्री.खडामकर यांनी दिनांक २ जानेवारी, २०१३ रोजी त्यांना पूर्ण पथकासहीत कंपनी पाहणीचे आदेश असूनही फक्त दोन - तीन अधिकाऱ्यांसह पाहणी करणे, कामगार संघटनेकडे मा.औद्योगिक न्यायालय ठाणे यांचा नवीन मनुष्यबळ भरतीस मनाई आदेश असताना पोलीसांच्या बंदोबस्तात व प्रसंगी पोलीस गाड्यातून नवीन कामागार कंपनीत प्रवेश करीत असणे, तरी या संपूर्ण प्रकरणी चौकशी करुन कामगारांना न्याय देण्यासाठी शासनाने

करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : २ एप्रिल, २०१३.

**डॉ.अनंत कळसे,**
प्रधान सचिव,
महाराष्ट्र विधानपरिषद.